**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १८ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारची मंजुरी.**
2. **अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात १२ वर्षांच्या मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे राज्य शासनाचे आदेश.**
3. **केंद्रीय मंत्रिमंडळातर्फे 'भारत औद्योगिक विकास योजना' मंजूर, देशभरात १०० 'प्लग-अँड-प्ले' औद्योगिक पार्क विकसित करणार.**
4. **पूर्व विदर्भात आज गारपीटीची शक्यता; बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा अंदाज.**

एलपीजी पुरवठा

व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. त्यामुळं या ग्राहकांना आता मासिक वापराच्या सरासरीच्या ३० टक्के एलपीजी मिळेल. अधिकाधिक व्यावसायिक ग्राहकांनी एलपीजी ऐवजी पाइप गॅसचा वापर करावा यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन पेट्रोलियम सचिवांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून केलं आहे.

ॲसिड हल्ला

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान परिसरात १३ वर्षीय मुलीवर ॲसिड फेकल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. संबंधित विद्यार्थीनी ही संगमनेरच्या एका विद्यालयात इयत्ता पाचवीमध्ये शिक्षण घेत असून शाळा सुटल्यानंतर सायकलवरून घरी जात असताना, एका अज्ञाताने तिच्यावर ॲसिड फेकले. या हल्ल्यात मुलगी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरु आहे. संगमनेर पोलिसांनी हल्लेखोराचा शोध सुरू केला असून या अमानुष कृत्याच्या निषेधार्थ आज संगमनेरच्या तळेगाव फाटा, वडगाव पान इथं सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं .

विधीमंडळ

संगमनेर तालुक्यात १२ वर्षांच्या मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करायच्या सूचना पोलीस प्रशासनाला देण्यात आलेल्या आहेत, असं आश्वासन गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिलं. ॲसिड सहज उपलब्ध होऊ नये, यासाठी समिती स्थापन करून उपाययोजना करण्यात येतील, असं आश्वासन भोयर यांनी दिलं. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून...

*(व्हाइस कास्ट - हेमांगी)*

***अहिल्यानगर जिल्ह्यात एका बारा वर्षीय मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याचा मुद्दा काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून उपस्थित केला. याच विषयावर बोलू देण्याची मागणी नाना पटोले यांनी केली. मात्र अध्यक्षांनी त्यांना परवानगी नाकारली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी काही सदस्यांना बोलू देण्याचा आग्रह धरला. यावर पोलिसांना योग्य ते निर्देश दिल्याचं अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं. स्वयंअर्थसहाय्यित शाळांची स्थापना आणि विनियमन करणाऱ्या विधेयकाला विधान परिषदेनं आज मंजुरी दिली. कालच विधानसभेची याला मंजुरी मिळाली होती. राज्यातल्या सार्वजनिक विश्वस्त संस्थांप्रमाणेच देशपातळीवरच्या चांगल्या संस्थांच्या स्वयंअर्थसहाय्यित शाळांना याद्वारे परवानगी मिळणार आहे. अचानक शाळा बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांचं होणारं नुकसान टाळण्यासाठी आगाऊ नोटिशीचा काळ १८ महिन्यांवरून दुप्पट करणं आणि ५ ते १० लाख रुपयांचा दंडही दुपटीने वाढवणं इत्यादी तरतुदी या विधेयकात आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ दुसरी सुधारणा विधेयक तसंच महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक, २०२६ देखील आज विधानपरिषदेत मंजूर झालं. प्लॅस्टिक किंवा तत्सम फुलांवर बंदी घालणारी विशेष अधिसूचना काढली जाईल, वेगळी यंत्रणा तयार केली जाईल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधान परिषदेत दिलं. अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करायचे अधिकार महानगरपालिकांना दिले जातील. तसंच, अशा फुलांचा वापर सजावटीसाठी करणाऱ्या मंगल कार्यालयांवरही कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले. प्लॅस्टिकच्या फुलांच्या विक्रीवर बंदी घातल्यासंदर्भातला प्रश्न आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला होता. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी हेमांगी कुलकर्णी)***

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

केंद्रीय मंत्रिमंडळाने 'भव्य अर्थात भारत औद्योगिक विकास योजना' मंजूर केली असून देशभरात १०० 'प्लग-अँड-प्ले' औद्योगिक उद्याने विकसित करण्यासाठी ३३ हजार ६६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जागतिक दर्जाची औद्योगिक पायाभूत सुविधा उभारून उत्पादनक्षमता वाढवणं आणि देशाच्या विकासगाथेला चालना देण हा या योजनेचा उद्देश असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं. या अंतर्गत १०० ते १००० एकर क्षेत्रफळाची औद्योगिक क्षेत्र विकसित केली जाणार असून प्रति एकर एक कोटी रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाईल. आज घेतलेल्या निर्णयांबद्दल वैष्णव यांनी माहिती दिली

***(होल्ड बाईट -अश्विनी वैष्णव ३५ सेकंद)***

मंत्रिमंडळाने २०२३-२४ या कापूस हंगामासाठी भारतीय कापूस महामंडळाला किमान आधारभूत किंमत अंतर्गत १ हजार ७१८ कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मंजूर केला आहे. याशिवाय मंत्रिमंडळाने २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी लघु जलविद्युत विकास योजना देखील मंजूर केली आहे.

राज्यसभा निरोप

राजकारणात सक्रीय असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात कधीच पूर्णविराम नसतो, त्यामुळे कार्यकाळ संपल्यानं राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांनीही यापुढेही देशहितासाठी कार्यरत रहावं, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या ५९ सदस्यांना आज निरोप देण्यात आला त्यावेळी तेबोलत होते. राज्यसभेतून निवृत्त होणारे एच. डी. देवेगौडा, मल्लिकार्जुन खर्गे आणि शरद पवार यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी आपल्या आयुष्यातील अर्ध्याहून अधिक काळ संसदीय कार्यासाठी समर्पित करत नवीन खासदारांसमोर निष्ठा आणि समाजसेवेचा एक आदर्श घालून दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. राज्यसभेचे उपसभापती **हरिवंश** यांनी दिलेलं योगदान वाखाण्याजोगं असल्याचं मोदी म्हणाले.

राष्ट्रीय विधी उत्सव

कायदा विद्यार्थ्यांसाठी आयोजित राष्ट्रीय विधी महोत्सव Justa Causa National Law Festival 2026 दिनांक २० ते २२ मार्च दरम्यान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ इथं आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात देशभरातील सुमारे १०० नामांकित विधी महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवार दिनांक 20 मार्च रोजी सायंकाळी मुंबई उच्च

न्यायालय नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या हस्ते होईल. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय ओक यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला राहील. या महोत्सवात व्याख्यानमाला, नागपूर डायलॉग युवा संमेलन तसेच युवक संसद स्पर्धेसारखे विविध शैक्षणिक उपक्रम होणार आहेत.

कवी संमेलन

नागपूरच्या भारतीय खान ब्युरो मुख्यालयात काल महानियंत्रक पंकज कुलश्रेष्ठ यांच्या अध्यक्षतेत आंतर कार्यालयीन राजभाषा कवी संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. अधिकारी वर्ग तसेच नगरराज भाषा कार्यान्वयन समितीचे विविध सदस्य यांनी या कवी संमेलनात सहभाग घेतला. कार्यालयीन हिंदीचा अधिकाधिक वापर वाढावा यासाठी आम्ही सदैव प्रयत्न करत असतो आणि हे कवी संमेलन देखील याच प्रयत्नांचा भाग असल्याचं पंकज कुलश्रेष्ठ यावेळी म्हणाले.

सहकारी संस्था

राज्यातील मजूर सहकारी संस्था सोबतच महिला सहकारी संस्थांना शासनाच्या विविध कामांमध्ये अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती वाढवणे तसेच कामांचे पारदर्शक आणि न्याय्य वाटप सुनिश्चित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. व्यवहार्य धोरण निश्चित करण्यासाठी ५ सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

बायोगॅस यंत्रणा

अकोला जिल्ह्यात मुर्तिजापूर तालुक्यामध्ये मुरंबा गावातल्या जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी केंद्रातल्या विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी सुमारे ६५ हजार रुपये किमतीची बायोगॅस यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हवामान

हवामान -पूर्व विदर्भातील वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज मेघगर्जनेसह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. या जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा ऑरेंज अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. याशिवाय नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला

आहे. उद्या अकोला आणि बुलढाणा वगळता सर्वत्र वादळी पर्जन्यमान कायम राहणार असल्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहे.

*****